


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ | Mob- 9822720784 | Title Code- MAHMAR-51647 | Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७४२. वा | गुरुवार | दि. १८ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये




# जिल्हा रुग्णालयातील त्या भ्रष्टाचाऱ्यांकडून वसुली कधी करणार?...

## डॉ. पंडित, डॉ. तडसांच्या कार्यकाळात अनिर्बंध भ्रष्टाचार...

## बदली व निलंबन करोडो रुपयांचे भ्रष्टाचाऱ्यांवर वरिष्ठांकडून पांघरून टाकण्याचा प्रयत्न सिटी न्यूज व दै.जनसंचलन हाणून पाडणार

**जनसंचलन/बुलढाणा**

नेहमी चर्चेत असलेले जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचारातून आजवर आलेल्या विविध अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मलिदा लाटला आहे. खरे तर या करोडो रुपये भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करून त्यांच्याकडून शासनाच्या झालेल्या लुटीची वसुली व्याजासह करण्यात आली पाहिजे, कर्तव्यात असलेले वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार थांबवण्याऐवजी भ्रष्टाचाराची ही मालिका यथासांग पुढे सुरू ठेवली आहे. तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. प्रेमचंद पंडित व डॉ. नितीन तडस सह संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यकाळात व झालेल्या करोडो रुपयांची भ्रष्टाचाराची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करून भ्रष्टाचारातून जमवलेली अपसंपदा शासन तिजोरीत कधी जमा करणार, हा सर्वांत मोठा प्रश्न आज जिल्हा प्रशासनासमोर आ वासून उभा आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचारासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने माहिती प्रसारित करून जनसामान्यांपर्यंत या भ्रष्टाचाराची माहिती पोहोचविण्याचे काम करीत आहे. सर्वसामान्य, गरीब व गरजू नागरिकांना चांगल्या आरोग्याच्या सेवा देऊन देशात आरोग्य व्यवस्था मजबूत करण्याची जबाबदारी ज्या जिल्हा रुग्णालयावर आहे, तेच रुग्णालय भ्रष्टाचाराच्या महारोगाने ग्रसित झालेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी राजरोसपणे आणि बेबंदपणे भ्रष्टाचार होतो आहे. कोरोना १९ महामारीच्या काळात जेंव्हा सर्व मानवजातीवर संकटांचे काळे ढग पसरले होते, त्या वेळी जिल्हा

### पोस्टमार्टम ७२

रुग्णालयातील अनेक भ्रष्ट अधिकाऱ्यांनी केवळ स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केलेले आहे. त्यातून त्यांनी मोठ्या प्रमाणा आपल्या करोडो रुपयांचा अवैध संपत्तींचा आकडा देखील फुगवून घेतला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक असताना डॉ. प्रेमचंद पंडित व डॉ. नितीन तडस यांच्या काळात तर भ्रष्टाचाराने परमोच्च पातळी गाठली होती. जिल्हा रुग्णालयाच्या प्रत्येक विभागात भ्रष्टाचार बोकाळला होता. जिल्हा रुग्णालय हे या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात अक्षरशः भ्रष्टाचाराचे कुरणच बनले होते. कोरोना महामारीच्या काळात मोठ्या प्रमाणात औषधी व उपकरणांची खरेदी करण्यात आली होती. त्या कार्यकाळात खरेदी करण्यात आलेले साहित्य व औषधी जिल्हा रुग्णालयापर्यंत पोहोचलीच नाही. ती मधल्यामध्ये कुठे गायब झाली, याची कोणालाही माहिती नाही. दुर्दैवाची बाब म्हणजे हे सर्व तपासण्याची तसदी कोण्याही अधिकाऱ्याने घेतली नाही. जिल्हा रुग्णालय तर सोडाच परंतु आरोग्य उपसंचालक अकोला किंवा आरोग्य संचालक पुणे ,मुंबई याठिकाणच्या एकाही अधिकाऱ्याने या घोटाळ्याचा तपास करण्यात रुची दाखवली नाही. यावरून एक स्पष्ट आहे की, हा घोटाळा एका मोठ्या वर्गाच्या सहमतीने झाला आहे. ज्या गुन्ह्यात एकापेक्षा अधिक लोकांचा सहभाग आहे, खरे तर त्याला संघटित गुन्हेगारी म्हटली पाहिजे. या प्रकरणात तर अनेक अधिकारी व कर्मचारी सामिल आहेत. एकीकडे हे सर्व होत असताना दुसरीकडे रोख विभागातही प्रचंड गैरव्यवहार होत होते. तत्कालीन रोखपाल पी. के. माळी हे तर आज जिल्हा रुग्णालय प्रशासनासाठी मोठी डोकेदुखी बनले आहेत. रोखपाल माळी यांनी कॅशबुकात प्रचंड खाडाखोड करून कोट्यवी रुपयांचा भ्रष्टाचार केला. परंतु त्यांच्यावरही कारवाईच्या नावाने शंखच आहे. कोणतीही कारवाई होत नसल्या कारणाने मग अधिकारी हा मस्तवाल बनतो. तो चांगलाच निर्ढावतो आणि पुन्हा मोठ्या भ्रष्टाचाराला उद्युक्त होतो. जिल्हा रुग्णालयात ते वारंवार घडते आहे. पी. के. माळी हे प्रचंड घोटाळा करून नामानिराळे झाले. पुढे ते सेवानिवृत्त झाले. त्यांनी ज्यांच्याकडे पदभार सोपवला ते लाकडे देखील भ्रष्टाचारात शेरास सव्वाशेर निघाले. त्यांनी अर्धवट असा पदभार घेतला. मात्र, कामकाज ते पूर्ण पदभार घेतल्यासारखाच करीत आहेत. कारण अनेक विषयांची माहिती नसतानाही आणि अधिकार प्राप्त नसतानाही आर. एस.लाकडे हे प्रचंड प्रमाणा बिले अदा करीत आहेत. ही बिले वाढीव दराने असल्या कारणाने त्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार होत आहे. याबाबत जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे विचारणा केली असता, अधिकारी कानावर हात ठेवतात आणि आर.एस.लाकडे हे तर अत्यंत साळसूदपणे निष्पाप व्यक्तीसारखा चेहरा करतात. आतून सगळा भ्रष्टाचार करायचा आणि बाहेरून स्वतःला अत्यंत सोज्वळ दाखवायचे, असले ढोंग सध्या लाकडे आणि




त्यांचे वरिष्ठ करीत आहेत. भ्रष्टाचाराला ठायी-ठायी आपले हातपाय पसरण्यास जिल्हा रुग्णालयात वाव दिला जात आहे. त्यामुळे दिवसेंदिवस जिल्हा रुग्णालयाची अवस्था ढासळत चालली आहे. जिल्हा रुग्णालयातील सेवा पूर्णपणे विस्कळित झाल्या आहेत. जिल्हा रुग्णालयात पदोपदी भ्रष्टाचार बोकाळला आहे. डॉ. प्रेमचंद पंडित असो डॉ. नितीन तडस असो की आणखी कोणी प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक असो यांच्या गैरव्यवहारांच्या प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यांच्याकडून भ्रष्टाचाराच्या रकमेची व्याजासह वसुली करणे फार गरजेचे आहे. जोपर्यंत ही कायदेशीर प्रक्रिया होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात लढत राहील व वृत्तमालिका प्रकाशित करीत राहील. कारण हा जो भ्रष्टाचार होतो आहे, त्यातून सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान होते आहे आणि दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज नेहमीच सर्वसामान्य नागरिकांच्या बाजून लढणारे वृत्तपत्र आहे. त्यामुळे आम्ही आमची सामाजिक बांधिलकी म्हणून भ्रष्टाचाऱ्यांचे बुरखे टराटरा फाडतच राहणार आहोत.

अजून बरेच काही पुढील भागात

# लग्नाला जाणारी स्कार्पिओ उलटल्यामुळे अंबाशी येथील चौघेजण भीषणअपघातात ठार...

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

देउळगाव राजा तालुक्यातील दगडवाडी जवळ आज भीषण अपघात झाला आहे १७ एप्रिल च्या संध्याकाळी हा अपघात झाला लग्नाच्या कार्यक्रमाला जाणाऱ्या वराडी मंडळींची स्कार्पिओ गाडी उलटली झालेल्या या अपघातामध्ये अंबाशी येथील चार जणांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार चिखली तालुक्यातील अंबाशी येथील आठ जण स्कॉर्पिओ वाहनाने जालना येथे जात होते यावेळी दगडवाडी येथे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन उलटले व भीषण अपघात झाला या अपघातामध्ये वसंत देशमुख (४५), अशोक भीमराव नायक(६५), विलास जयवंत देशमुख(६३), हे जागीच ठार झाले तर योगेश लक्ष्मण देशमुख या चालकास उपचाराला नेत असताना त्याचा सुद्धा मृत्यू झाला गोपाल आबाराव देशमुख(४३), शालिनी देशमुख(३४), मीरा संजय देशमुख(४०), अक्षरा संदीप देशमुख(१९) यांच्यावर देऊळगाव राजा येथे उपचार सुरू आहे. थरकाप उडवणारा हा अपघात आहे



# शेंदुर्जन, दुसरबीड येथे वन बुलडाणा मिशनचा रोड शो !...

## जिल्ह्यातील जनतेला परिवर्तन हवंय - संदीप शेळके

**जनसंचलन/बुलडाणा**

जनतेचा कौल परिवर्तनाच्या दिशेने आहे, जनतेला परिवर्तन पाहिजे आहे. वन बुलडाणा मिशनने मांडलेल्या परिपूर्ण विकास संकल्पनेला जिल्हावासियांनी पसंती दिली आहे. त्यामुळे आपला विजय निश्चित असल्याचा दावा वन बुलडाणा मिशनचे संकल्पक तथा बुलडाणा लोकसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांनी केला. त्यांच्या प्रचारार्थ १७ एप्रिल रोजी दुसरबीड, शेंदुर्जन येथे रोड शो चे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, जनतेशी संवाद साधताना ते बोलत होते. दरम्यान ठीकठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी जेसीबीने शेळकेंवर पुष्पृष्टी करण्यात आली. यावेळी जनतेशी संवाद साधताना ते म्हणाले की, गेली अनेक वर्ष झाले, जिल्ह्याचा विकास खुंटला आहे. त्यामुळे आता निवडणुकीच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणण्याचा निर्धार जनतेला केला आहे. विकसित बुलडाणा जिल्ह्याचे चित्र टीपण्याचे आपले ध्येय आहे. सुरूवातीपासूनच वन बुलडाणा मिशनने जिल्हा विकासासाठी अभ्यासपूर्ण धोरणे तयार केली आहे, त्यामुळे जनतेने



ठरविल्याप्रमाणे प्रस्थापितांना कायमचा आराम देवून, आपला विजय निश्चित असल्याचा दावा शेळके यांनी केला. पुढे बोलताना ते म्हणाले की, मला जनतेकडून खूप प्रेम मिळत आहे. प्रस्थापित राजकारणांनी आजवर जिल्ह्याच्या विकासासाठी कुठलीही ठोस भूमिका घेतली नाही, त्यामुळे जनतेचा त्यांच्यावर रोष आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणी विचार केला नाही. त्यामुळे आपण सर्वात आधी शेतकरी हिताचा विचार करणार आहोत. शेतमालाला भाव , शेतपांदन रस्ते, तालुक्याच्या ठिकाणी सीडहब, सिंचनाची वाढती टक्केवारी, नदीजोड प्रकल्प अशा विविध प्रकारच्या शेतकऱ्यांच्या कल्याणकारी योजना प्रत्यक्षात आपण उतरविणार आहोत.

जिल्ह्यात सुशिक्षित तरुणांना रोजगार नाही त्यामुळे प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी तयार झाली पाहिजे हा आपला विचार आहे, बचत गटाच्या महिला भगिनींकरता ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध झाली पाहिजे, गाव खेड्याच्या विद्यार्थ्यांसाठी मैदानी सरावा करता मैदान उपलब्ध झाले पाहिजे, असा सर्व विकासाचा मायक्रोप्लान आज आपल्या डोक्यात आहे, खासदार झाल्यानंतर सगळी विकास धोरणे प्रत्यक्षात दिसून येतील अशी ग्वाही शेळके यांनी दिली.

# अवैध रेती वाहनाच्या धडकेत तरुण जागीच ठार

**जनसंचलन/ लोणार**





लोणार मेहकर रस्त्यावर शहरातून सुसाट वेगाने जाणाऱ्या अवैधरीत्या रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परने स्टेट बँके समोर अंदाजे २१ वर्षीय तरुणाला धडक दिल्यानेत्याचा जागीच मृत्यूझाल्याची दूर्दैवी घटना दि, १६ एप्रील रोजी रात्री ८ वाजेदरम्यान घडली. तहसीलदार गिरीष जोशी यांनी सदर टिप्परचा पाठलाग करुन टिप्पर मेहकर पोलीस स्टेशणला लावले. सविस्तर वृत्त असे की मराठवाड्यातील तळणी परीसारातील पुर्णा नदीपात्रातून अवैधरीत्या रेती वाहतूक मोठ्या प्रमाणात राजेरोसपणे सूरु आहे. दि. १६ एप्रील रोजी ही अवैधरीत्या रेती वाहतूक कराणार्या एम.एच. २१ बिएच ४९४८ टिप्परने मृतक ज्ञानेश्वर आदीनाथ पवार वय अंदाजे २१ हा आपल्या शारा या मुळगावी पैदल जात असताना सुसाट वेगाने येणाऱ्या टिप्परने त्याला जबर धडक दिली. घटनास्थळावर डोक्याचा मेंदू बाहेर पडल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. ही थरकाप उडवीणारी घटना पहाताच घटनास्थळावर नागरीक संतप्त झाले होते. विशेष म्हणजे अजिसपूर येथे एका महीणा अगोदर ३० वर्षीय शेख सिराजचाही बळी या अवैध रेती वाहतुक करणाऱ्या वाहनाने घेतला होता. एका महीण्यात निष्पाप बळी जाणारी ही दूसरी घटना असल्याने अधीकारी यांच्या हप्तेखाऊ धोरणामुळे शहरातील नागरीकांचे निष्पाप बळी जात असल्याची चर्चा नागरीक घटनास्थळावर करताना दिसून येत होते. विशेष म्हणजे विना नंबर रेती वाहने वाहातूक करीत असताना आरटिओ अधीकारी वाहतूक पोलीस यांनी आपल्या डोळ्यावर धूतराष्ट्रासाराखी काळी पट्टी बांधल्याचे निर्देशणास येत आहे. जिल्हाधीकारी, एसडीओ यांचेही याकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष होताना दिसून येत आहे. तरी वरीष्ट स्तरावरुन लक्ष घालून रेती माफीयाला पायबंध घालण्याची मागणी नागरीक करीत आहे.

# अल्पवयीन मुलीस पळविल्या प्रकरणी दोघांना अटक

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

येथील पोलिस ठाण्यांतर्गत असलेल्या एका गावातील अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्याप्रकरणी ११ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपी हे गंभीर गुन्ह्यांमध्ये यापूर्वी सहभागी झालेले असल्याने साखरखेर्डा पोलिसांनी दोन्ही आरोपींना मोठ्या शिताफीने अटक केली आहे. साखरखेर्डा पोलिस स्टेशन अंतर्गत एका गावातील अल्पवयीन मुलीस जागदरी येथील सराईत गुन्हेगार अंकुश उर्फ श्रीकृष्ण शिवाजी डोईफोडे (२१) आणि सचिन गजानन काळुसे (२६) - यांनी १० एप्रिल रोजी फूस लावून पळवून नेले होते. त्यामुळे गावात घबराट निर्माण झाली होती. दोन्ही आरोपी हे एका खुनाच्या प्रकरणातील आरोपी होते. त्यातही एका महिलेच्या प्रकरणावरून त्यांनी काटा काढला होता. नेमके या दोघांनी अल्पवयीन मलीला पळवन नेल्याची माहिती मिळताच ठाणेदार स्वप्निल नाईक यांनी पीएसआय रवींद्र सानप, भागवता धुड, रामदास वैराळ, नितीन राजे जाधव यांनी गोपनीय माहितीच्या आधारावर दरेगाव येथून सचिन काळुसे यास १३ एप्रिल रोजी ताब्यात घेतले. चौकशीत अंकुशने संबंधित मुलीस वाघाळा शिवारात नेल्याची माहिती दिली. तेथे ते दोघे प्रेमाच्या आणाभाका घेत जिवाचे बरेवाईट करण्याच्या उद्देशाने लपले होते. याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तातडीने सर्च ऑपरेशन राबवत ग्रामस्थांच्या मदतीने १३ एप्रिल रोजी दोघांना ताब्यात घेतले. मुलीला वडिलांच्या ताब्यात देऊन अंकुश उर्फ श्रीकृष्ण शिवाजी डोईफोडे आणि त्याचा सहकारी सचिन काळुसे याच्या विरोधात तक्रार देण्यात आली त्यावरून पोलिसांनी अल्पवयीन मुलीस फूस लावून पळविणे, अत्याचार करणे यासह विविध कलमान्वये गुन्हे दाखला केले आहेत. दोन्ही आरोपींची १६ एप्रिल रोजी न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

# कट मारल्याचा वादावरून दुचाकी स्वाराचे डोके फोडून केले जखमी...

## इको गाडी चालकासह ३ अज्ञात विरुद्ध गुन्हा दाखल...

**जनसंचलन/ सोनाळा**



दुचाकीला इको गाडी चालकाने कट मारल्याचा वाद विकोपाला गेला. त्यामुळे गाडी चालक व इतर ३ जणांनी दुचाकीस्वार आदिवासी युवकास चापटा बुक्क्यांनी व दगड गोट्यांनी मारहाण करून डोके फोडल्याची घटना सोमवार दुपारी ५ वाजेदरम्यान टूनकी वसाली रस्त्यावर आलेवाडी येथील जखमी शाइद कासम केदार वय ३० वर्षे याच्या फिर्यादीवरून सोनाळा पोलीसांनी इको कारचालक अय्यास खान सलीम खानव इतर ३ अज्ञात आरोपी विरुद्ध अप नं ११५/२४ कलम ३२४, ३२३, ५०४ भादंविनुसार गुन्हा दाखल केला आहे. जखमी शाइद केदार याचेवर समोसा रुग्णालय शेगाव येथे उपचार सुरु आहेत. घटनेची हकीकत अशी की, रसुलपूर ता जळगाव जा. येथील उपरोक्त ४ जण इको कार क्रं एमएच २८ बीके ४८६३ या चार चाकीने आलेवाडी येथे कुंकवाच्या कार्यक्रमासाठी जात होते. त्या दरम्यान आलेवाडी येथील शाइद हा त्याचा शहजाद नामक ४ वर्षीय मुलास टूनकी येथे दवाखान्यात उपचारासाठी दुचाकीवर बसवून घेऊन जात असतांना टूनकी गावाजवळ स्मशानभूमि लगत पुलावर इको या चारचाकी वाहनाने शाइद यास कट मारला. याचा जाब इको वाहन चालकास विचारला असता शाइद यास मारहाण केली. नदीतील दगड गोटे मारले त्यात शाइदचे डोके फुटले. तर आरोपी फरार आहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न...

**जनसंचलन/बुलढाणा**

शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न दिनांक ३ व ४ एप्रिल रोजी स्थानिक शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा येथे वार्षिक स्नेहसंमेलन-विविधतेत एकता २०२३-२४ मोठ्या उत्साहात साजरी झाले .या वार्षिक स्नेहसंमेलनाची मुख्य संकल्पना ही विविधतेतून एकता ही ठरवण्यात आली होती .यावेळी उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ.प्रशांत कोठे, प्राचार्य जिजामाता महाविद्यालय बुलढाणा,कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. सीमा लिंगायत शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा प्रामुख्याने उपस्थित होते. यासोबतच सांस्कृतिक कार्यक्रम प्रभारी प्रा.डॉ.नूतन चव्हाण. प्रा.डॉ.अनिल वरघट छात्र संसद प्रभारी, प्रा.डॉ. हर्षानंद खोब्रागडे, प्रा. डॉ.संध्या सामुद्रे, प्रा. डॉ.सुनील खडसे,प्रा. राहुल एस.हिवाळे, ग्रंथपाल प्रकाश डोंगरदिवे आदी उपस्थित होते . उद्घाटन कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन भारती वायाळ आणि अश्विनी बुडुकले यांनी केले. स्वागत गीत किरण चुनावले ,अश्विनी कुहिरे आणि सृष्टी निकम व धनश्री गवई यांनी सादर केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ.अनिल वरघट यांनी केले त्यानंतर छात्र संसद विद्यापीठीय सचिव दीक्षा जाधव यांनी वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे यांनी केले. यावेळी त्यांनी उद्घाटनीय मार्गदर्शन केले त्यानंतर कार्यक्रम अध्यक्ष भाषण प्राचार्य डॉ.सीमा सुरेश लिंगायत यांनी केले .आभार प्रदर्शन छात्र संसद सचिव दीक्षा जाधव यांनी केले.



दिनांक ४ एप्रिल २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे समारोपिय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सीमा लिंगायत, शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा या होत्या.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी मार्गदर्शक म्हणून शालिग्राम उन्हाळे माजी मुख्याध्यापक ,भारत विद्यालय, बुलढाणा उपस्थित होते. शाळेमध्ये शिक्षकांचे व्यक्तिमत्व आणि शिस्त यासंबंधी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण चुनावाले, रविराज चव्हाण यांनी केले ,प्रास्ताविक दीव्या गवले, पाहुण्यांचा परिचय निशा इंगळे यांनी केले,तर स्वागत गीत चैताली पुरुषोत्तम, दीक्षा इंगळे, पूजा इंगळे यांनी केले. प्रमुख अतिथी शालिग्राम उन्हाळे माजी मुख्याध्यापक यांनी सविस्तर मार्गदर्शन केले त्यानंतर अध्यक्ष भाषण प्राचार्य डॉ.सीमा लिंगायत यांनी केले. प्राचार्य डॉ. सीमा लिंगायत मॅडम यांनी बी.एड प्रशिक्षणार्थी यांना आवाहन केले की ,कठोर शिस्त व कर्तव्य पालन हा मानवी जीवनाच्या सुसंस्काराचा एक महत्त्वाचा पाया आहे .म्हणून शिस्त ही यशस्वी आयुष्या करीता महत्त्वाची आहे .

या समारोपीय कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पूजा टेकाळे यांनी केले. सदर या वार्षिक स्नेहसंमेलनात बी.एड प्रशिक्षणार्थी यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

# निवडणूकीत मतासाठी दारू आणि पैसे देणाऱ्या उमेदवाराला जनतेनी मते देवु नका अविनाश पाटील यांचे आव्हान

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

निवडणूकीत मतासाठी दारू आणि पैसे देणाऱ्या उमेदवाराला जनतेनी मते देवु नका असे अवाहण महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलण समितीचे राज्याचे अध्यक्ष तथा व्यसण मुक्त महाराष्ट्र समन्वय मंच राज्यनिमंत्रक आविनाश पाटील यांनी ता .१६ रोजी देऊळगांव मही येथे केले आहे . ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयतीच्या निमीत्ताने लोकसभा निवडणूकीच्या पार्शभुमीवर विदर्भ दौरावर आले होते .या दौऱ्यात मध्यप्रदेश मधील शिवणी जिल्हासह नागपुर ,आमरावती , बुलडाणा येथे कार्यकर्त्याच्या भेटी घेतल्या यावेळी त्यांच्या सोबत राज्यसरचिटणीस संजय शेंडे,मनोहर धंदर,गौरव आळणे,प्रदीप हिवाळे अदी सोबत होते. निवडणूकीच्या काळात लोकांना दारूच्या नशेत ठेवून त्यांची मती गुंग करून त्यांच्याकडून मते मिळविली जातात.अनेकांना निवडणूक प्रचार काळात दारूचे व्यसन लागते आणि ते अकाली मृत्यू येईपर्यन्त पोहचते. व्यसनाजन्य पदार्थाच्या विक्रीतून सरकारांना मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो.तसेच व्यसनाजन्य पदार्थांची निर्मिती, वितरण आणि विक्रीवर सरकारचे नियंत्रण नाही.कायदे नियम तोडून व्यसनांचा विळखा दिवसेंदिवस वाढत आहे.आरोग्यांचे प्रश्न, कौटुंबिक कलह, शोषण, गुन्हेगारी,अपघात, भ्रष्टाचार आणि बेकायदेशीर बाबी व्यसनातून निर्माण होत आहेत. व्यसन हे विवेक विरोधी असून समाजाचे आणि देशाचे स्वास्थ बिघडविणारे आहे.त्यामुळे व्यसनविरोधी प्रचार, प्रसार, प्रबोधन,कायदा, निती, धोरण, समुपदेशन व वा उपचार केंद्रांची आवश्यकता आहे.त्यासाठी राजकीय पक्ष,उमेदवार,नेते यांनी भूमिका घेऊन कृती करण्याची गरज आहे.देशात सुरु असलेल्या लोकसभा निवडणुक प्रक्रियेत व्यसन विरोधी भूमिका घेण्याचे आवाहन राजकीय पक्ष व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना आम्ही व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचाच्या वतीने करत आहोत. व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचात सहभागी असलेल्या संघटना, संस्था, गट, व्यक्ती यांच्या वतीने राजकीय पक्ष, उमेदवार, नेते व पदाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे निवडणूक प्रचारात व्यसनाजन्य पदार्थांचे वाटप, वितरण करू नये. निवडणुकोत्तर काळात व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करावेत. देश पातळीवर कठोर व्यसनमुक्ती धोरण आणण्यासाठी प्रयत्न करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. ज्या राज्याने व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले आहे, अशा राज्यांसाठी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी.



व्यसनांपासून सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नापासून व्यसनमुक्तीच्या कार्यासाठी केंद्र सरकारने किमान ५% रकमेची तरतूद करावी. प्रत्येक जिल्ह्याला १००बेडचे एक सरकारी व्यसनमुक्ती उपचार केंद्र असायला हवे. शैक्षणिक अभ्यासक्रमात व्यसनमुक्ती हा विषय असावा. प्रत्येक तालुक्यात व्यसनमुक्ती समुपदेशन केंद्र असणे गरजेचे आहे.

# दारू प्यायला पैसे दिले नाही म्हणून सलूनची केली तोडफोड

**जनसंचलन/ खामगाव**

दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने दोघांनी संगनमत करून सलून दुकानाची तोडफोड केली. यात अमडापूर नाक्यावरील दुकानाचे दहा हजार रुपयांचे नुकसान झाले. ही घटना सोमवारी रात्री घडली. फिर्यादीनुसार, सागर बबन पंडित (२८) याला अमदापूर नाका येथील सलून दुकानात अटक करण्यात आली. आकाश अशोक धांडे व सूरज शांताराम बेलोकर हे दुकानात आले. दारू पिण्यासाठी पैशांची मागणी करू लागले. त्यांना पैसे देण्यास नकार दिल्याने दोघांनी दुकानातील साहित्याची नासधूस केली. अश्लील शिवीगाळ करून चापटाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच तक्रारदाराच्या योगेश नामक भावासही अश्लील शिवीगाळ करून दुकानाची काच पापड़े फोडली व इतर साहित्याची नासधूस केल्याचा आरोप तक्रारीत केला. या तक्रारीवरून शिवाजी नगर पोलिसांनी उपरोक्त दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे



# युवकांमध्ये जाणीव जागृतीसाठी मॉडेल डिग्री कॉलेजचा पुढाकार

## लोकशाही बळकट करण्यासाठी युवकांचा सहभाग महत्वपूर्ण

**जनसंचलन/बुलडाणा**

युवक हा प्राधान्य मानून समाजातील सर्व घटकांमध्ये मतदार जाणीव जागृती करण्यासाठी मॉडेल डिग्री कॉलेजच्या प्राध्यापकांनी पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील वरीष्ठ महाविद्यालयांच्या माध्यमातून मतदार जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यातून मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होणार आहे. विद्यार्थी दशेपासूनच युवकांना देशातील निवडणूक प्रक्रिया, त्या अनुषंगीक अधिकारांची माहिती करून देणे, तसेच मतदार नोंदणी आणि विविध स्तरावरील निवडणूक कार्यक्रम, त्यामधील सहभाग याबद्दल ज्ञान वृद्धींगत करण्याच्या उद्देशाने यापूर्वीच वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ व लोकशाही दालनाची स्थापना करण्यात आली आहे. यापार्श्वभूमीवर समाजातील सर्व घटकांमध्ये मतदानाविषयी व्यापक जाणीवजागृतीचा संदेश देण्यासाठी आयोजित करावयाच्या विविध उपक्रमांविषयी मॉडेल डिग्री कॉलेजच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपचे जिल्हा नोडल अधिकारी बी. एम. मोहन यांची भेट घेतली. त्यामध्ये मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे, प्रा. अर्चना गावंडे पाटील, प्रा. मनोज डांगे, प्रा. मनिषा राऊत, प्रा. डॉ. प्रेरणा पाटील, प्रा. डॉ. रिंढे, प्रा. भिसे आदींचा समावेश होता. सशक्त लोकशाही व्यवस्थेसाठी निवडणूक प्रक्रिया, मतदार नोंदणी आणि जाणीव जागृतीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहेत. भारतीय निवडणूक प्रक्रियेविषयी नागरीकांमध्ये जागरुकता निर्माण करून लोकप्रतिनिधी आणि मतदारांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वृद्धींगत करणे हा या मागील मुख्य हेतू आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ व लोकशाही दालनाची स्थापना व कार्यान्वयन करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रिया व मतदार जाणीव जागृतीसाठी विविध कल्पक उपक्रमांचे आयोजन करण्याच्या उद्देशाने मॉडेल डिग्री कॉलेजचे ४२ प्राध्यापक जिल्ह्यातील महाविद्यालयांना भेटी देणार आहे. जिल्ह्यातील नवमतदार व सर्वसाधारण मतदारांनी भारतीय लोकशाही व्यवस्थेचा गौरव वाढविण्यासाठी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्यासाठी जाणीव जागृती करणार आहेत. दरम्यान आगामी लोकसभा निवडणूकीत समाजातील सर्व घटकांनी पुढे येऊन मतदानाचे कर्तव्य पार पाडावे, यासाठी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी पुढाकार घ्यावा व मॉडेल डिग्री कॉलेजच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांनी केले आहे.

# विदर्भातील त्या पाचही जागांवर इंडिया आघाडीचा होणार विजय पक्का-नाना पटोले

**वृत्तसंस्था/गोंदिया**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचाराच्या शेवटच्या दिवशीही कॉंग्रेस नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला. लोकसभेची निवडणूक जनतेने हातात घेतली असून कॉंग्रेस आणि इंडिया आघाडीच्या उमेदवारांना जनतेचा आशिर्वाद मिळाला आहे. विरोधी पक्षांच्या उमेदवाराला लोकांनी अनेक गावातून हाकलून लावले. १० वर्षातील अत्याचारी कारभाराला जनता कंटाळली आहे. मोदी सरकारविरोधात जनतेमध्ये तीव्र संताप असून विदर्भातील पाचही जागांवर इंडिया आघाडीच्या उमेदवारांचा विजय होईल, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे. भंडाऱ्यात पत्रकारांशी संवाद साधताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, केंद्रातील तानाशाही सरकारने १० वर्षात देशाची संपत्ती विकून देश चालवला, देश कर्जबाजारी करून ठेवला, तरुणांचे जीवन बरबाद केले, शेतकऱ्यांना उद्धवस्त केले, महागाई, बेरोजगारी या ज्वलंत विषयावर भाजपाचे नेते बोलतच नाहीत, हा राग जनतेच्या मनात आहे. मोदी सरकारचा कारभार पाहून जनतेने त्यांचा निर्णय पक्का केला असून परिवर्तन होणार असे चित्र विदर्भातील पाचही मतदारसंघात दिसेल.कॉंग्रेस पक्षाने जाहीर सभा, चौक सभा घेण्याबरोबरच घरोघरी जाऊन ५ न्याय आणि २५ गॅरंटीची माहिती लोकांपर्यंत पोहचवली. कॉंग्रेस पक्षाने दिलेली गॅरंटी जनतेचे कल्याण करणारी आहे तर मोदी गॅरंटी ही भ्रष्टाचारी लोकांना वाचवणारी आहे. भ्रष्ट लोकांना ईडी, सीबीआयकडून दबाव आणून भाजपात प्रवेश द्यायचा आणि वॉशिंगमधून त्यांना स्वच्छ करण्याचे काम भाजपाने केले आहे.भाजपाच्या उमेदवारांनी आचारसंहितेचा भंग केला, खर्चाची मर्यादाही ओलांडली असून त्यासंदर्भात कॉंग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रारी केल्या आहेत. भारतीय जनता पक्षाने मतविभाजनाचा प्रयत्न केला असला तरी त्यात त्यांना यश येणार नाही. कॉंग्रेस आणि गांधी, नेहरु परिवारावर आरोप करून भाजप सत्तेत आले परंतु १० वर्षात भाजपाने काय केले यावर ते बोलत नाहीत. नेहरु, गांधी परिवारावर टीका करुन भाजप पापे लपवण्याचा प्रयत्न करत आहे, असे नाना पटोले म्हणाले.भंडारा-गोंदियाचे इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या प्रचारार्थ गोंदिया शहरात पदयात्रा काढण्यात आली. मामा चौकातून



सुरु झालेली ही पदयात्रा नेहरू चौक, आंबेडकर चौक, गांधी चौक, गोरेलाल चौक, दुर्गा चौक, चांदणी चौक, शंकर चौक, यादव चौक, रामनगर, पाल चौक ते गुरुद्वारा मरार टोली बस स्टॉप येथे समाप्त झाली. या पदयात्रेदरम्यान कॉंग्रेसचे न्यायपत्र नागरिकांना देण्यात आले. यावेळी गोंदिया कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष मा. आ. दिलीप बनसोडे, गोंदिया कॉंग्रेस शहराध्यक्ष योगेश अग्रवाल, तालुकाध्यक्ष रमेश अंबुले, कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याआधी सकाळी नाना पटोले यांनी डब्बा ता. अर्जुनी येथे कॉर्नर सभेला संबोधित केले.

## श्रीराम नवमी निमित्त बुलढाण्यात भव्य शोभायात्रा..

## श्री गजानन महाराज मंदिर येथून शोभायात्रेला झाली सुरुवात..

**जनसंचलन/बुलढाणा**

हिंदुत्वाचे आराध्य दैवत प्रभु श्री राम यांचा आज जन्मतोस्व राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. विशेष प्रभु श्रीराम भक्त यांचे स्वप्न पुर्ण झालेले आहे. कित्येक वर्षा पासून प्रतीक्षा असलेले प्रभुचे मंदिर



आयोध्या मध्ये पूर्ण झाले आहे. श्रीराम नवमी शोभायात्रा उत्सव समितीच्या वतीने आज सायंकाळी बुलढाणा शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.श्रीराम नवमीला आज सायंकाळी ६ वाजता विष्णूवाडीतील संत गजानन महाराज मंदिरातून या भव्य शोभायात्रेला प्रारंभ करण्यात आला आहे. या शोभायात्रेमध्ये प्रभु श्रीरामाची भव्य मूर्ती, हनुमानजीची भव्य मूर्ती, छ. शिवाजी महाराज यांची भव्य मूर्ती, शेगावीचा राणा संत गजानन महाराज यांची आकर्षक मूर्ती यासह वारकरी पथक, झांज पथक, शिवकालीन मर्दानी खेळ, ढोलताशा पथक, संगीतमय रामायण, रामदरबार झाकी हे या शोभायात्रेचे विशेष आकर्षण होते.. प्रभू श्रीरामाची ही भव्य शोभायात्रा शहरातील गजानन महाराज मंदिरापासून संगम चौक, जयस्तंभ चौक, महावीर मार्ग, जनता चौक, कारंजा चौक येथून मार्गक्रमण करणार





आहे. चौकाचौकात विविध संस्था व मंडळाच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात येणार आहे. संपूर्ण शहर भगवेमय झाले असून या शोभायात्रेत श्रीराम भक्त हिंदू बांधव व भगिणीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहे.बुलढाणा शहरात आज रोजी भगवमय वातावरण दिसून आले आहे.

## नांद्राकोळी येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिया फूले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सव साजरा

**जनसंचलन/बुलढाणा**

दि १२/०४/२०२४ वार शुक्रवार रोजी मौजे नांद्राकोळी येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिया फूले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सार्वजनिक जयंती उत्सव साजरा करण्यात आला त्यामध्ये प्रवाह शिक्षण क्रिडा व बहु. संस्था नांद्राकोळी संस्थेमार्फत महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्र पर पुस्तकांचे वाटप संस्थेमार्फत करण्यात आले तसेच रमजान ईद निमित्त शिरखुरमा वाटप करण्यात आले सदर सार्वजनिक उत्सवानिमित्त मा. गरुड साहेब ठाणेदार, प्रा.पो. बुलढाणा यांनी पुस्तकांचे वाटप करते वेळी महापुरुषांचे विचार खऱ्या अर्थाने समाजात पोहचवण्याचे साधन म्हणुन पुस्तक वितरण हे प्रभावी साधन आहे असे कार्यक्रमावेळी बोलताना त्यांनी भावना व्यक्त केल्या. तसेच मुस्लिम बांधवानम्या पवित्र सन रमजान ईद सुध्दा साजरी करताना बिर शिवाजी मित्र मंडळ यांनी शुभेच्या भेटी वेळी उपस्थित ग्रामस्थांना शिरखुरमा वाटप या वेळी केले अशा सार्वजनिक जयंती साजरी तसेच पुस्तक वाटपामुळे शिव-फुले-शाहू- अबिडकर यांचे विचार



तळागाळापर्यत पाहेचण्यास नक्कीच मदत होईल असे आदर्श उपक्रम नेहमीच येणा- या पिढीला प्रेरणादायी ठरतील, सदर कार्यक्रमांचे अध्यक्ष माणून संजय संपत काळवाचे ग्रा.प सदस्य उपस्थित होते. प्रास्ताविक विशाल गणेश काळवाचे अध्यक्ष प्रवाह शिक्षण क्रिडा संस्था नांद्राकोळी यांनी केले तसेच सुत्रसंचालन सागर खंडागळे यांनी केले या कार्यक्रमावेळी दलितमित्र माधवराव हुडेकर संचय चतरु काळवाघे माजी सरंपच, समाधान जाधव, मोहन जाधव उपसरपंच, जाकीर शहा, रहिम शहा, वैभव काळवाचे मोहन जाधव, ऑनल खंडागळे, रमेश उबाळे, आकाश हिवाळे आदिनाथ हिवाळे, शुभम काळवाचे उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे आयोजन विर शिवाजी मित्र मंडळ यांनी केले होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958